दै. प्रजावाणी

लोकसंख्येच्या तुलनेत यादीत तफावत

# मतदारसंख्या उणेअधिक

नांदेड, दि.३१: प्रारूप मतदारयादीत प्रभागाबाहेरील नगरातील मतदारांच्या 'ढकलाढकली'च्या अनोख्या प्रयोगाची चर्चा सुरू असताना, आता प्रभागातील मतदारसंख्येतही कमालीची तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. शिवाजीनगर, होळी व गुरुद्वारा प्रभागात लोकसंख्येच्या ८५ ते ८८ टक्के, तर हैदरबाग व उमर कॉलनीसारख्या प्रभागात हेच प्रमाण ५३ व ६० टक्के इतके आहे. लोकसंख्येनुसार झालेल्या प्रभाग रचनेतील मतदारांच्या संख्येत इतकी तफावत कशी येते, असा प्रश्न आता विचारला जात आहे.

सन २०११च्या लोकसंख्येनुनसार महापालिकेची प्रभाग रचना करण्यात आली. संपूर्ण शहरातील लोकसंख्या चार सदस्यांच्या प्रभागांच्या १९ व पाच सदस्यांच्या प्रभागाच्या एक अशा २० प्रभागांमध्ये विभागण्यात आली. चार सदस्यांच्या प्रभागात सरासरी २५ ते ३० हजार आणि पाच सदस्यांच्या प्रभागात सरासरी ३५ ते ४० हजार लोकसंख्येचा निकष यासाठी ठेवण्यात आला. परंतु, मतदारयादीची फोड करताना कोणताही निकष नाही. लोकसंख्येच्या निकषाची सरासरी मतदारांच्या संख्येत तुलनात्मकदृष्ट्या जुळत नसल्यामुळे प्रारूप मतदारयादीत महाघोळ झाल्याच्या चर्चेने अधिक जोर धरला आहे. यादीची फोड करण्यात दिरंगाई केल्यामुळे दोन सहायक आयुक्तांसह इतर दोघांना नोटिसा देण्यात आल्या. पण, त्यांच्यावर कारवाई केली गेली नाही.

प्रभागरचनेनुसार गुरुद्वारा, प्रभाग क्रमांक १७ मध्ये लोकसंख्या २६ हजार ७३१ आहे. परंतु मतदारांची संख्या मात्र तब्बल २५ हजार ५३७ पर्यंत पोहचली आहे. याचाच अर्थ मतदानाचा अधिकार नसलेली १८ वर्षाखालील केवळ ११९४ मुले-मुलीच या भागात शिल्लक असल्याचे मानावे लागेल. स्थानिक नेतृत्वाच्या राजकीय अस्तित्वाची परीक्षा ठरू शकणाऱ्या शिवाजीनगर, प्रभाग क्रमांक आठची

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | लोकसंख्या (२०११) | मतदारांची संख्या (२०१७) | तुलनात्मक प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ८ | शिवाजीनगर | २६,७४४ | २२,७४२ | ८५.०३ % |
| १४ | होळी | २६,३६१ | २२,५५३ | ८५.५५ % |
| १७ | गुरुद्वारा | २६,७३१ | २३,५३७ | ८८.०५ % |
| ११ | हैदरबाग | २९,४३८ | १५,६३१ . | ५३.०९ % |
| १२ | उमर कॉलनी | २९,३३८ | १७,६७८ | ६०.२५ % |

अवस्थाही काहीशी अशीच आहे. येथे २६ हजार ७४४ लोकसंख्या व मतदारांची संख्या २२ हजार ७४२ आहे. जुन्या नांदेडातील होळीची परिस्थिती यांच्यापेक्षा वेगळी नाही. २६ हजार ३६१ लोकसंख्या असलेल्या या प्रभागात २२ हजार ५५३ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत आहेत. परंतु दुसरीकडे हैदरबाग, उमर कॉलनीसारख्या मुस्लीमबहुल प्रभागात लोकसंख्येच्या तुलनेत ५५ टक्क्यांच्या आसपास मतदार दर्शविण्यात आले आहेत. हैदरबाग प्रभाग ११ मध्ये लोकसंख्या २९ हजार ४३८ आहे. तेथे मतदारांची संख्या मात्र केवळ १५ हजार ६३१ इतकी आहे. उमर कॉलनीत २९ हजार ३३८ मतदार आहेत. परंतु, मतदार मात्र जेमतेम १७ हजार ६७८ आहेत.

▪पान २ वर

## गुरुद्वारा प्रभागात व्याप्तीबाहेरचे मतदार नाहीत: कंदेवार



नांदेड,दि.३१: गुरुद्वारा प्रभागात ज्या २९ नगरांतील मतदारयादीतील भाग क्रमांक दर्शविण्यात आले आहेत, सदर भागातील मतदारांच्या नावे नोंदविलेल्या मालमत्तेची विधानसभा मतदारसंघाच्या मूळ यादीत गुरुद्वारा प्रभागातच नोंद असून प्रभागाच्या व्याप्तीबाहेरचे मतदार या प्रभागाच्या यादीत समाविष्ट केले नाहीत, असा दावा महापालिकेचे उपायुक्त (निवडणूक) संतोष कंदेवार यांनी 'दै. प्रजावाणी'शी बोलताना केला.

'मतदारयादीतील महाघोळ' सदराखाली बातमी ▪पान २ वर

**मतदारसंख्या...**

२०११ च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या आणि गेल्या सहा वर्षांत वाढलेल्या मतदारांमुळे सरासरीत वाढ झाल्याचे गृहीत धरले, तर सर्व प्रभागांत त्याच्या सरासरीत अधिक फरक नसावा, असे कोणीही सांगेल. परंतु, कुठे कमी व कुठे जास्त अशी मतदारांची तफावत दिसून येत आहे.